सदर तोडावयाची झाडे संपुर्णत: शासकीय हददीतील असल्याचे संदर्भिय पत्र अनुक्रमे 5 व 6 यांनी या कार्यालयास कळविले आहे. तरी मी उपविभागीय अधिकारी कळंब मला प्रदान करण्यात आलेला अधिकाराचा वापर करुन महाराष्ट जमीन महसुल अधिनियम 1966 चे कलम 25 खालील नियम म.ज.म. (लाकुड तोड लाकुड तोडण्याचा पुरवठा इत्यादीचे नियमन) नियम 1967 मधील नियम 3 (2) च्या तरतुदीनुसार खालील अटीच्या अधिन राहुन अर्जदार भारतीय राष्टीय महामार्ग प्राधिकरण विकास

..2..

औरंगाबाद यांना राष्टीय महामार्ग क्रं.211 च्या कि.मी. 100/000 ते 141/600 मधील लांबीतील असलेले शासकीय हददीतील फळझाडे वगळुन वर नमुद केलेल्या संदर्भ क्रं. 8 अन्वये विभागीय वन अधिकारी उस्मानाबाद यांनी मुल्यांकन करुन दिलेल्या यादीतीलच कळंब तालुक्यातील 182 व वाशी तालुक्यातील 4924 एकुण 5106 महसुल खात्यास परवानगी असलेले झाडे तोडण्याची परवानगी देण्यात येत आहे.

सदर आदेशाप्रमाणे तहसिलदार कळंब व वाशी यांनी संबंधित तलाठी यांना सदर आदेशामध्ये नमुद झाडे तोडत असतांना प्रत्यक्षात हजर राहण्यास सूचित करावे. तसेच संबंधित तलाठी यांनी सदर आदेशामध्ये दिलेल्या संख्येप्रमाणे झाडे तोडणे झाल्यानंतर तसा अहवाल या कार्यालयास सादर करावा. तसेच अर्जदाराने सदर झाड तोडल्याची कार्यवाही संबंधित तलाठी यांच्याशी संपर्क करुन त्यांच्या प्रत्यक्षात करावी.

**:- अटी -:**

1. सदरील झाडे तोडतांना आपल्या हददीतीलच तोडावीत.
2. शेजारील शेतक-यांचे चुकून अथवा काही कारणास्तव झाड तोडल्यास त्याची सर्व जबाबदारी आपणावर राहील व न्यायालयीन बाब उदभवल्यास त्यास आपणच जबाबदार रहाल.
3. सदरील झाडे तोडण्याबाबत कोणताही वाद निर्माण झाल्यास त्याबाबत आपली जबाबदारी राहील.
4. आपल्या हददीतील फळझाडे वगळुन इतर झाडे तोडण्याची परवानगी देण्यात येत आहे.
5. एखादया शेतक-यांनी झाडाबददल वाद केल्यास ते झाड तोडु नये. मालकी सिध्द करुनच पुढील कार्यवाही करावी.
6. जेवढी झाडे तोडलेली आहे त्याच्या पाचपट झाडे लावावीत.
7. महसुल खात्यास जे अधिकार आहेत तेच झाडे तोडावीत इतर झाडाबददल ज्यांना अधिकार आहेत त्यांची परवानगी घेवुनच पुढील कार्यवाही करावी.
8. सदर झाडांची विल्हेवाट संबंधीत कार्यकारी अभियंता राष्टीय महामार्ग क्रं. 211 यांचे साहयाने करावी.

—sd—
उपविभागीय अधिकारी
कळंब

प्रत - तहसीलदार कळंब/वाशी यांना माहितीस्तव

प्रत - संबंधीत गाव कामगार तलाठी तालुका कळंब/वाशी यांना आवश्यक त्या कार्यवाहीस्तव देण्यात येते.

प्रत - अर्जदार प्रकल्प संचालक, भारतीय राष्टीय राजमार्ग प्राधिकरण विभाग, औरंगाबाद B 23, कामगार चौकाजवळ N- 4 सिडको औरंगाबाद 431003.

20/6/15
उपविभागीय अधिकारी
कळंब

जा.क्र. ३२८५
७/७/१५

वाचा:-१.प्रकल्प संचालक भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण विभाग औरंगाबाद यांचा प्रस्ताव दि.२७/४/२०१५.
२.मंडळ अधिकारी,भूम यांचा चौकशी अहवाल दिनांक३०/६/२०१५.
३. तहसीलदार भूम यांचा प्रस्ताव क्रं.२०१५/जमाबंदी/कावी/७३३ दि.६/७/२०१५.

क्रमांक.२०१५/जमा/कावी/४७६
उपविभागीय अधिकारी कार्यालय भूम.
दिनांक:-७/७/२०१५.

**-०- आ दे श -०-**

अर्जदार प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमाग्र प्राधिकरण विभाग औरंगाबाद यांनी भूम तालुक्यातील रामकुंड येथील रस्त्याच्या माध्यमातून दोन्ही बाजुस राष्ट्रीय महामार्ग क्रं.२११ च्या कि.मी. १००/००० ते १४१/६०० या लांबीतील असलेली शासकीय हददीतील झाडे तोडण्याची परवानगी मागीतलेली आहे.

उपरोक्त तहसीलदार भूम व मंडळ अधिकारी भूम यांनी वरील नमुद दिनांक च्या पत्रानुसार अहवाल सादर केला असून त्यामध्ये झाडांची संख्या व प्रकार अशी एकुण ४४ झाडे असल्याचे अहवालात नमुद केले आहे.

सदर तोडावयाची झाडे संपुर्णत: शासकीय हददीतील असल्याचे संदर्भीय पत्र अनुक्रमे २ व ३ यांनी या कार्यालयास कळविले आहे. तरी मी उप विभागीय अधिकारी भूम मला प्रदान करण्यांत आलेलया अधिकाराचा वापर करुन महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम १९६६ चे कलम २५ खालील नियम म.ज.म. (लाकुड तोड लाकुड तोडण्याचा पुरवठा इत्यादीचे नियमन) नियम १९६७ मधील नियम ३ (२) च्या तरतुदीनुसार खालील अटीच्या अधिन राहुन अर्जदार भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण विकास औरंगाबाद यांना राष्ट्रीय महामार्ग क्रं.२११ च्या कि.मी.१००/००० ते १४१/६०० मधील लांबीतील असलेले शासकीय हददीतील फळझाडे वगळून वर नमुद केलेल्या लिंब-१ + काशीद-७ + ग्रेस्रेडिया-३६ =४४ महसुल खातयास परवानगी असलेले झाडे तोडण्याची परवानगी देण्यांत येत आहे.

**सदर आदेशा प्रमाणे तहसीलदार भूम यांनी संबंधीत तलाठी यांना सदर आदेशामध्ये नमुद झाडे तोडत असतांना प्रत्यक्षात हजर राहण्यास सूचित करावे. तसेच संबंधीत तलाठी यांनी सदर आदेशामध्ये दिलेल्या संख्ये प्रमाणे झाडे तोडणे झाल्यानंतर तसा अहवाल तहसील कार्यालयास सादर करावा. तसेच अर्जदाराने सदर झाडे तोडल्याची कार्यवाही संबंधीत तलाठी यांच्याशी संपर्क करुन त्यांच्या प्रत्यक्षात करावी.**

**अटी**

१.सदरील झाडे तोडतांना आपल्या हददीतीलच तोडावीत.
२.शेजारील शेतक-यांचे चुकून अथवा काही कारणास्तव झाड तोडल्यास त्याची सर्व जबाबदारी आपणांवर राहील व न्यायालयीन बाब उदभवल्यास त्यास आपणच जबाबदार रहाल.

AURANGABAD
Inward No. 1576
Date 09/07/15
File No.

Pl. put up urgently.
11/7/9

-२-

३.सदरील झाडे तोडण्या बाबत कोणताही वाद निर्माण झाल्यास त्या बाबत आपली जबाबदारी राहील.

४.आपल्या हददीतील फळझाडे वगळून इतर झाडे तोडण्याची परवानगी देण्यांत येत आहे.

५.एखादया शेतक-यांनी झाडाबददल वाद केल्यास ते झाड तोडु नये. मालकी सिध्द करुनच पुढील कार्यवाही करावी.

६.जेवढी झाडे तोडलेली आहेत त्याच्या पाचपअ झाडे लावावीत.

७.महसुल खातयास जे अधिकार आहेत तेच झाडे तोडावीत इतर झाडाबध्ददल ज्यांना अधिकार आहेत त्यांची परवानगी घेवुनच पुढील कार्यवाही करावी.

८.सदर झाडांची विल्हेवाट संबंधीत कार्यकारी अभियंता राष्ट्रीय महामार्ग क्रं.२११ यांचे साहयाने करावी.

-sd-
उप विभागीय अधिकारी,
भूम.

प्रतः- तहसीलदार भूम यांना माहितीस्तव.

प्रतः- संबंधीत गावकामगार तलाठी तालुका भूम यांना आवश्यक त्या कार्यवाहीस्तव देण्यांत येते.

प्रतः-अर्जदार प्रकल्प संचालक भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण विभाग औरंगाबाद B २३- कामगार चौकाजवळ एन-४ सिडको औरंगाबाद ४३१००३.

उप विभागीय अधिकारी,
भूम.

पहा- 1. तहसिलदार गेवराई यांचे पत्र क्र.2015 / जमा-1/ झाडतोड प./कावी- 88, दि.06.07.2015
2.प्रोजेक्टर डायरेक्टर भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण औरंगाबाद यांचे पत्र क्र.NHAI/PU/AUR/NH-211 (A-Y)Tree Cutting/2015/641 दि.27.4.2015
3. मंडळ अधिकारी पाचेगाव,रेवकी व गेवराई यांचा स्थळ पहाणी अहवाल दि.26.06.2015

क्र.2015 / जमाबंदी/ झाड तोड.पर/कावि-259
उपविभागीय अधिकारी कार्यालय, बीड.
दिनांक :- 13.07.2015.

उपविभागीय अधिकारी बीड

आदेश

राष्ट्रीय महामार्ग क्रं.211 रस्ता रुंदीकरणात मौजे हिरापुर ते खामगाव मध्ये येत असलेली झाडे तोडण्याची परवानगीसाठी प्रोजेक्ट डायरेक्टर भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण औरंगाबाद यांनी त्यांचे पत्र क्रं.NHAI/PU/AUR/NH-211(A-Y)Tree Cutting/2015/641 दि.27.4.2015 चे पत्रान्वये झाडे तोडण्याची परवानगी मागीतली आहे.

प्रकरणात मंडळ अधिकारी पाचेगाव,रेवकी व गेवराई यांनी दि.26.06.2015 रोजी प्रत्यक्ष स्थळ पहाणी करून स्थळ पहाणी अहवाल तहसिलदार गेवराई यांचे मार्फत या कार्यालयास सादर केलेला आहे. संदर्भीय पत्रकाचे व मंडळ अधिकारी पाचेगाव,रेवकी व गेवराई यांचे स्थळ पहाणी अहवालाचे अवलोकन केले असता, राष्ट्रीय महामार्ग क्रं.211 रस्ता रुंदीकरणासाठी दोन्ही बाजूची असणारी झाडे तोडणे आवश्यक आहेत, म्हणून खाली नमुद केलेनुसार महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम 1966 चे कलम 22 व 25 व त्याखालील पोट नियम 3 अन्वये ( झाडे तोडण्या बाबत नियमन) नियम 1964 चे नियम 3 अन्वये खालील तक्त्यात वर्णन केलेल्या जमीनीतील वर्णन केलेली झाडे तोडण्यास खालील अटीस अधिन राहून परवानगी देण्यात येते.

5. या परवानगी नुसार झाड / झाडे तोडल्यामुळे कोणत्या ही व्यक्तीच्या मालमत्तेच्या झालेल्या कोणत्याही हानीबद्दल नुकसान भरपाई भरण्यास प्रतिग्रहीता पात्र असेल.
6. तोडावयाच्या झाडांच्या संख्येच्या दुप्पट झाडे लावावीत व पर्यावरणाचा समतोल राखला जाईल याची दक्षता घ्यावी.
7. ईतर हक्कदारांचा आक्षेप आल्यास परवाना रद्द केला जाईल. ही परवानगी ज्या तारखेस देण्यात आली त्या तारखेपासून तीस दिवसाच्या कालावधीसाठी वैध असेल.
8. महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम 1966 मधील तरतुदी नुसार सदर झाडांची शासकीय नियमानुसार विल्हेवाट लावण्यात यावी.

| अनु क्र. | जमीनीचे वर्णन | झाडांचे वर्णन | शेरा |
|---|---|---|---|
| 1 | राष्ट्रीय महामार्ग क्र.211 हिरापुर ते खामगाव रस्त्याचे रुंदीकरणात येणा-या दोन्ही बाजू | सोबतच्यायादीतील लिंब,आंबा,जांभुळ,बदाम,कवट बोर,नारळ इत्यादी एकूण 167 झाडे वगळून. | अधिनियमातील कलम 15 उपकलम (2) मधील अनुसुचितील नमूद 1 ते 16 प्रकारची झाडे वगळून |

स्वाक्षरीत
उपविभागीय अधिकारी,
बीड.

प्रतिलिपी- माहीतीस्तव व आवश्यक त्या कार्यवाहीस्तव.
1.तहसिलदार गेवराई यांना माहीतीस्तव.
2.प्रोजेक्ट डायरेक्टर भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण औरंगाबाद यांना माहीतीस्तव व आवश्यक त्या कार्यवाहीस्तव.
3.गटविकास अधिकारी पं.स.गेवराई यांना माहीतीस्तव
4.आदेश संचिका.

उपविभागीय अधिकारी,
बीड.

पहा- 1. तहसिलदार बीड यांचे पत्र क्र.2015 / जमा/ अकृषी /कावी-349 दि.30.06.2015
2.प्रोजेक्टर डायरेक्टर भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण औरंगाबाद यांचे पत्र क्रं.NHAI/PU/AUR/NH-211 (A-Y)Tree Cutting/2015/640 दि.27.4.2015
3. मंडळ अधिकारी पेंडगाव,पाली,मांजरसूंभा व लिंबागणेश यांचा स्थळ पहाणी अहवाल दि.18 व 26.06.2015

क्र.2015 / जमाबंदी/ झाड तोड.पर/कावि-260
उपविभागीय अधिकारी कार्यालय, बीड.
दिनांक :- 13.07.2015.

उपविभागीय अधिकारी बीड

**आदेश**

राष्ट्रीय महामार्ग क्रं.211 रस्ता रुंदीकरणात मौजे चौसळा ते पारगाव जप्ती मध्ये येत असलेली झाडे तोडण्याची परवानगीसाठी प्रोजेक्ट डायरेक्टर भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण औरंगाबाद यांनी त्यांचे पत्र क्रं.NHAI/PU/AUR/NH-211(A-Y)Tree Cutting/2015/640 दि.27.4.2015 चे पत्रान्वये झाडे तोडण्याची परवानगी मागीतली आहे.

प्रकरणात मंडळ अधिकारी पेंडगाव,पाली यांनी दि.19.6.2015 रोजी व मं.अ.मांजरसूंभा व लिंबागणेश यांनी दि. 18.6.2015 रोजी प्रत्यक्ष स्थळ पहाणी करून स्थळ पहाणी अहवाल तहसिलदार बीड यांचे मार्फत या कार्यालयास सादर केलेला आहे. संदर्भीय पत्रकाचे व मंडळ अधिकारी पेंडगाव,पाली,मांजरसूंभा व लिंबागणेश यांचे स्थळ पहाणी अहवालाचे अवलोकन केले असता, राष्ट्रीय महामार्ग क्रं.211 रस्ता रुंदीकरणासाठी दोन्ही बाजूची असणारी झाडे तोडणे आवश्यक आहेत, म्हणून खाली नमुद केलेनुसार महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम 1966 चे कलम 22 व 25 व त्याखालील पोट नियम 3 अन्वये ( झाडे तोडण्या बाबत नियमन) नियम 1964 चे नियम 3 अन्वये खालील तक्त्यात वर्णन केलेल्या जमीनीतील वर्णन केलेली झाडे तोडण्यास खालील अटीस अधिन राहून परवानगी देण्यात येते.

1. या परवानगी नुसार झाड / झाडे तोडल्यामुळे कोणत्या ही व्यक्तीच्या मालमत्तेच्या झालेल्या कोणत्याही हानीबद्दल नुकसान भरपाई भरण्यास प्रतिग्रहीता पात्र असेल.
2. तोडावयाच्या झाडांच्या संख्येच्या दुप्पट झाडे लावावीत व पर्यावरणाचा समतोल राखला जाईल याची दक्षता घ्यावी.
3. ईतर हक्कदारांचा आक्षेप आल्यास परवाना रद्द केला जाईल. ही परवानगी ज्या तारखेस देण्यात आली त्या तारखेपासून तीस दिवसाच्या कालावधीसाठी वैध असेल.
4. महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम 1966 मधील तरतुदी नुसार सदर झाडांची शासकीय नियमानुसार विल्हेवाट लावण्यात यावी.

| अनु क्र. | जमीनीचे वर्णन | शेरा |
|---|---|---|
| 1 | राष्ट्रीय महामार्ग क्र.211 चौसाळा ते पारगाव जप्ती रस्त्याचे रुंदीकरणात येणाऱ्या दोन्ही बाजू | अधिनियमातील कलम 15 उपकलम (2) मधील अनुसुचितील नमूद 1 ते 16 प्रकारची झाडे वगळून |

स्वाक्षरीत
उपविभागीय अधिकारी,
उपविभागीय अधिकारी
बीड.

प्रतिलिपी- माहीतीस्तव व आवश्यक त्या कार्यवाहीस्तव.
1.तहसिलदार बीड यांना माहीतीस्तव.
2.प्रोजेक्ट डायरेक्टर भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण औरंगाबाद यांना माहीतीस्तव व आवश्यक त्या कार्यवाहीस्तव.
3.गटविकास अधिकारी पं.स. बीडयांना माहीतीस्तव
4.आदेश संचिका.

उपविभागीय अधिकारी,
उपविभागीय अधिकारी
बीड.

# उपविभागीय अधिकारी कार्यालय,अंबड
## ता.अंबड जि.जालना

Ph/Fax.No.(02483) 221026 Email ID-sdmambad@gmail.com Login ID-Jalan.nic.in

जा.क्र.2015/जमाबंदी/रिआर- ५५५

दिनांक.06.08.2015

विषय:- NHA-PIU-AUR-Four laining for Rehabilitation and upgraduation of Yedshi-Aurangabad (K.M. 100/000 to 290/200 of NH-211 Under NHDP phase IV A & B in the State of Maharashtra –Tree cutting permission for the trees in NH-211 EROW from 219+100 to 245+085 k.m. 255+000 to 260+061.

वाचा: 1. महाराष्ट्र झाडे तोडण्याबाबत (नियमन) अधिनियम 1967 मधील तरतुदी
2. अर्जदार प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण विभाग औरंगाबाद पत्र क्रं.NHAI/PIU/AUR/NH-211(A-7) Tree-cutting/2015/642 Date-27.04.2015
3. तहसिलदार अंबड यांचे पत्र दि. 04.08.2015.
4. मं.अ. वडिगोद्री यांचा अहवाल दि. 03.08.2015.
5. मं.अ.जामखेड यांचा अहवाल दि. 03.08.2015.
6. कार्यालयीन टिपणी दि. 05.08.2015
7. वन परिक्षेत्र अधिकारी जालना यांचे पत्र क्रं.जा.क्रं.ब/मुल्यांकन/1112/2014-2015 दि.09.02.2015

NHAI PIU AURANGABAD Inward No. 1825 Date 07-08-15

## आदेश

अर्जदार प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण विभाग औरंगाबाद यांनी अंबड तालुक्यातील रस्त्याच्या माध्यमातुन दोन्ही बाजूस राष्ट्रीय महामार्ग क्रं.211 च्या कि.मी. 33 या लांबीतील असलेली शासकीय हद्दीतील झाडे तोडण्याची परवानगी मागितलेली आहे.

उपरोक्त तहसिलदार, अंबड व मंडळ अधिकारी वडिगोद्री व मंडळ अधिकारी जामखेड यांनी वरील नमुद दिनांकाच्या पत्रानुसार अहवाल सादर केला असून त्यामध्ये झाडांची संख्या व प्रकार अशी एकुण अंबड तालुक्यातील 1752 झाडे असल्याचे नमूद केले आहे.

सदर तोडावयाची झाडे संपूर्णतः शासकीय हद्दीतील असल्याचे संदर्भिय पत्र अनुक्रमे 4 ते 5 यांनी या कार्यालयास कळविले आहे. तरी मी उपविभागीय अधिकारी अंबड मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम 1966 चे कलम 25 खालील नियम म.ज.म. (लाकुड तोड लाकुड तोडण्याचा पुरवठा इत्यादिचे नियमन ) नियम 1967 मधील नियम 3 (2) च्या तरतुदीनुसार खालील अटींच्या अधिन राहुन अर्जदार भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण विकास औरंगाबाद यांना राष्ट्रीय महामार्ग क्रं.211 च्या कि.मी. 219+100 ते 245+085 कि.मी. 255+000 ते 260+061 मधील लांबीतील असलेले शासकीय हद्दीतील फळझाडे वगळून वर नमूद केलेल्या संदर्भ क्रं.7 अन्वये विभागीय वन अधिकारी जालना यांनी मूल्यांकन करून दिलेल्या यादितीलच अंबड तालुक्यातील 1752 एकूण महसूल खात्यास परवानगी असलेले झाडे तोडण्याची परवानगी देण्यात येत आहे.

सदर आदेशाप्रमाणे तहसिलदार अंबड यांनी संबंधीत तलाठी यांना सदर आदेशामध्ये नमूद झाडे तोडत असताना प्रत्यक्षात हजर राहण्यास सूचित करावे. तसेच संबंधीत तलाठी यांना सदर आदेशामध्ये दिलेल्या संख्येप्रमाणे झाडे तोडणे झाल्यानंतर तसा अहवाल या कार्यालयास सादर करावा. तसेच अर्जदाराने सदर झाड तोडल्याची कार्यवाही संबंधित तलाठी यांचेशी संपर्क करून त्यांच्या प्रत्यक्षात करावी.

## अटी

1. सदरील झाडे तोडताना आपल्या हद्दीतील तोडावीत.
2. शेजारील शेतक-यांचे चुकून अथवा काही कारणास्तव झाड तोडल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी आपणावर राहिल व या बाबत काही न्यायालयीन बाब उदभवल्यास त्यास आपणच जबाबदार राहाल.
3. सदरील झाडे तोडण्याबाबत कोणताही वाद निर्माण झाल्यास त्या बाबत आपली जबाबदारी राहील.
4. आपल्या हद्दीतील फळ झाडे वगळून इतर झाडे तोडण्याची परवानगी देण्यात येत आहे.
5. एखादया शेतक-यांनी झाडाबद्दल वाद केल्यास ते झाड तोडू नये. मालकी सिध्द करूनच पुढील कार्यवाही करावी.
6. जेवढी झाडे तोडलेली आहे त्याच्या पाचपट झाडे लावावीत.
7. महसूल खात्यास प्राप्त अधिकारा अंतर्गत येत असणारीच झाडे तोडावीत. इतर झाडाबद्दल ज्यांना अधिकार आहेत त्यांची परवानगी घेवून पुढील कार्यवाही करावी.
8. सदर झाडांची विल्हेवाट संबंधीत कार्यकारी अभियंता राष्ट्रीय महामार्ग क्र.211 यांचे साहयाने करावी.

Sd/-
उपविभागीय अधिकारी
अंबड

प्रतिलीपीः

1. तहसिलदार अंबड यांना माहितीस्तव व उचित कार्यवाहिस्तव.
2. सर्व संबंधीत तलाठी यांना आवश्यक त्या कार्यवाहीस्तव देण्यात येते.
3. अर्जदार प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण विभाग, औरंगाबाद B23, कामगार चौकाजवळ N-4 सिडको, औरंगाबाद 431003.

उपविभागीय अधिकारी
अंबड

वाचा :- १.या कार्यालयाचे समक्रमांकी आदेश दिनांक.२३.०७.२०१५

२.यू.जे.चामरगोरे,जीएम टीइसिएच अ‍ॅन्ड प्राजेक्ट डायरेक्टर पिआययू राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण,कामगार चौक,एन-४,औरंगाबाद यांचा विनंती अर्ज दिनाक. 30.७.२०१५

---

जा.क्र.२०१५/जमा-२/झाडतोड/कावि-३८७
उपविभागीय अधिकारी कार्यालय औरंगाबाद.
दिनांक :-०४.०८.२०१५.

## : : शुध्दीपत्रक : :

संदर्भ क्रमंक 2 अन्वये यू.जे.चामरगोरे,जीएम टीइसिएच अ‍ॅन्ड प्राजेक्ट डायरेक्टर पिआययू राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण,कामगार चौक,एन-४,औरंगाबाद यांनी संदर्भ क्रमांक 1 चे आदेशातील 4 नंबरीची अट वगळण्यास विनंती केली आहे.

करीता संदर्भ क्रमांक 1 चे आदेशामध्ये अंशत: बदल करुन अट नंबर 4 बगळण्यास परवानगी देण्यात येते उर्वरित कार्यावाही सदर आदेशात नमुद असल्या प्रमाणे अनुसरण्यात यावी.

सही/-
उपविभागीय अधिकारी
औरंगाबाद.

प्रतिलीपी :-

१.मा.जिल्हाधिकारी औरंगाबाद,यांना माहितीस्तव सविनय सादर.

२.तहसिलदार औरंगाबाद,यांना देवून कळविण्यांत येते की, सबंधीत तलाठी/मंडळ अधिकारी यांना झाडे व काटेरी छोटी मोठी झुडपे तोडण्यांत येवून त्याऐवजी फळदार झाडें लावण्याच्या अटीवर परवानगी देण्यांत आलेली आहे.तरी शासकीय जागेत दुप्पट झाडे लावून घेण्याची उचित कार्यवाही करावी.

३.यू.जे.चामरगोरे,जीएम टीइसिएच अ‍ॅन्ड प्राजेक्ट डायरेक्टर पिआययू भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण,कामगार चौक,एन-४ औरंगाबाद यांना प्रत देवून कळविण्यांत येते की,व तसेच सदर परवानगी ही दुप्पट फळदार झाडे लावण्याचे अटीवर देण्यांत आलेली आहे.सदर झाडे व काटेरी छोटी मोठी झाडे तोडण्यांत येवून दुप्पट झाडे लावण्यात यावी असे शासनाचे वतीने आवाहन करण्यांत येत आहे.तसेच उपरोक्त अटीचे पालन होईल याकडे लक्ष देण्यात यावे.

उपविभागीय अधिकारी
औरंगाबाद.

1825
5/8/15

वाचा :- १.महाराष्ट्र झाडे तोडणे (नियमन) अधिनियम १९६४ चे कलम नुसार.
२.यू.जे.चामरगोरे,जीएम टीइसिएच ॲन्ड प्राजेक्ट डायरेक्टर पिआययू राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण,कामगार चौक,एन-४,औरंगाबाद यांचे पत्र २७.४.२०१५.
३.उपवनसरंक्षक,वनविभाग औरंगाबाद यांचे पत्र क्र.११९४/२०१५-२०१६/दि.२.७.२०१५
४.तहसिलदार औरंगाबाद यांचे पत्र क्र.२०१५/जमा-१/कावि ४१२ दिनांक १४.७.२०१५.

---

जा.क्र.२०१५/जमा-२/झाडतोड/कावि-३८७
उपविभागीय अधिकारी कार्यालय औरंगाबाद.
दिनांक :-23.7.2015.

नमूना-२

महाराष्ट्र झाडे तोडण्या बाबत (नियम) अधिनियम १९६४ यांच्या (कलम) ३ (ब) अन्वये भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण,कामगार चौक एन-४ औरंगाबाद कार्यालय यांनी राष्ट्रीय महामार्ग एन.एच.२११ चे चौपदरीकरणांतर्गत येडशी-औरंगाबाद कि.मी.१००/००० ते २९०/२०० दरम्यानचा रस्ता रुदीकरण व्यवस्थेमध्ये अडचण निर्माण करीत असल्यामुळे सदर झाडे व काटेरी झुडपे काढण्यास परवानगी देण्यांत यावी असे संदर्भीय पत्र क्र.२ नुसार प्रस्तावित केलेले आहे.

आणि ज्याअर्थी, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण,कामगार चौक एन-४ औरंगाबाद यांनी राष्ट्रीय महामार्ग एन.एच.२११ चे चौपदरीकरणांतर्गत येडशी-औरंगाबाद कि.मी.१००/००० ते २९०/२०० दरम्यानचा रस्ता रुदीकरण व्यवस्थेमध्ये अडचण निर्माण करीत असल्यामुळे सदर झाडे व काटेरी झुडपे काढण्यास परवानगी देण्यांत यावी अशी विनंती केलेली आहे.

म्हणून त्याअर्थी, महाराष्ट झाडे तोडण्या बाबत (नियमन) अधिनियम १९६४ यांच्या १(कलम) ब अन्वये पांढरी ते निपाणी या दरम्यान असलेली औरंगाबाद तालुक्यातील आर.एच.एस. 413 झाडे एल.एच.एस.407 झाडे असे एकूण 820 झाडे तोडण्या बाबत अडचण निर्माण करीत असल्याचे अहवालात नमुद केलेले आहे.म्हणून,त्याअर्थी सदर 820/- झाडे तोडण्यास खालील अटी व शर्तीस अधिन राहून राष्ट्रीय महामार्ग एन.एच.२११ चे चौपदरीकरणांतर्गत येडशी-औरंगाबाद कि.मी.१००/००० ते २९०/२०० या दरम्यानचा रस्ता रुदीकरणा अंतर्गत औरंगाबाद तालुक्यांतील गांवाच्या हद्यीतील झाडे तोडण्यास परवानगी देण्यांत येत आहे.सदर कोणत्याही व्यक्तीच्या मालमत्तेच्या हानी होणार नाही. यादृष्टीने नुकसान भरपाई भरण्यांस प्रतिगृहीता पात्र असेल.

१.सदर परवानगी ज्या तारखेस ती देण्यांत आली त्या तारखेपासून सहा महिने कालावधीसाठी वैध असेल.

२.महामार्गाचे प्रत्यक्ष काम सुरु करण्यांचे पंधरा दिवस आधी सदर झाडे तोडण्यांचे काम सुरु करावे.त्या अगोदर झाडे तोडू नयेत.व याबाबत यू.जे.चामरगोरे,जीएम टीइसिएच ॲन्ड प्राजेक्ट डायरेक्टर पिआययू राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण,कामगार चौक,एन-४,औरंगाबाद यांनी खात्री करावी.

३.तसेच सदर परवानगी ही दुप्पट(शासकीय जागेत झाडे लावण्याचे अटीवर देण्यांत येते.

४.सदर झाडे व इतर छोटी मोठी काटेरी झुडूपांची हर्रास करण्यांत येवून त्यातून येणारी रक्कम ००२९ या महसूल शिर्षखाली जमा करुन अनुपालन अहवाल सादर करावा.

५.सदर नमुद करण्यांत आलेल्या अटीचे पालन न केल्यास सदर परवानगी ही रध्द समजण्यांत येईल.

सोबत:-विवरणपत्र

२-११ [signature]

उपविभागीय अधिकारी,

औरंगाबाद.

प्रतिलीपी :-

१.मा.जिल्हाधिकारी औरंगाबाद,यांना माहितीस्तव सविनय सादर.

२.तहसिलदार औरंगाबाद,यांना देवून कळविण्यांत येते की, सबंधीत तलाठी/मंडळ अधिकारी यांना झाडे व काटेरी छोटी मोठी झुडपे तोडण्यांत येवून त्याऐवजी फळदार झाडे लावण्याच्या अटीवर परवानगी देण्यांत आलेली आहे.तरी शासकीय जागेत दुप्पट झाडे लावून घेण्याची उचित कार्यवाही करावी.

३.यू.जे.चामरगोरे,जीएम टीइसिएच ॲन्ड प्राजेक्ट डायरेक्टर पिआययू भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण,कामगार चौक,एन-४ औरंगाबाद यांना प्रत देवून कळविण्यांत येते की, सदर तोडलेल्या झाडाचा हर्रासी करण्यांत येवून त्यातून येणारी रक्कम ००२९ महसूल शिर्षकाखाली जमा करावी.व तसेच सदर परवानगी ही दुप्पट फळदार झाडे लावण्याचे अटीवर देण्यांत आलेली आहे.सदर झाडे व काटेरी छोटी मोठी झाडे तोडण्यांत येवून दुप्पट झाडे लावण्यात यावी असे शासनाचे वतीने आवाहन करण्यांत येत आहे.तसेच उपरोक्त अटीचे पालन होईल याकडे लक्ष देण्यांत दयावे.

[signature]

उपविभागीय अधिकारी

औरंगाबाद.

punarv-2015

वाचा: (१) या कार्यालयाचे समक्रमांतीक आदेश दिनांक २४/०७/२०१५

(२) यु. जे. चामरगोरे, जी.एम. & प्रोजेक्ट डायरेक्टर पीयुआय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, कामगार चौक एन-४ औरंगाबाद यांचा विनंती अर्ज दिनांक : ३० / ०७ / २०१५

जा.क्र.२०१५/जमाबंदी/झाडतोडी/कावी- ६२२
उप विभागीय अधिकारी, पैठण-फुलंब्री,
मुख्यालय- औरंगाबाद
दिनांक :- १० /०८ / २०१५

:: शुध्दीपत्रक ::

संदर्भ क्र.२ अन्वये यु. जे. चामरगोरे, जी.एम. & प्रोजेक्ट डायरेक्टर पीयुआय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, कामगार चौक एन-४ औरंगाबाद यांनी संदर्भ क्रमांक १ चे आदेशातील ४ नंबरची अट वगळण्यास विनंती केली आहे.

करिता संदर्भ क्र १ चे आदेशामध्ये अंशतः बदल करुन अट नंबर ४ वगळण्यास परवानगी देण्यात येते उर्वरित कार्यवाही सदर आदेशात नमुद असल्या प्रमाणे अनुसरण्यात यावी.

स्वाक्षरीत
उप विभागीय अधिकारी (महसुल)
पैठण - फुलंब्री,
मुख्यालय - औरंगाबाद.

प्रतिलिपी:

1. मा. जिल्हाधिकारी औरंगाबाद , यांना माहितीस्तव सविनय सादर
2. तहसिलदार पैठण यांना देवुन कळविण्यात येते की, संबंधीत तलाठी/मंडळ अधिकारी यांना झाडे व काटेरी छोटी मोठी झुडपे तोडण्यात येवुन त्याऐवजी फळदार झाडे लावण्याच्या अटीवर परवानगी देण्यात आलेली आहे. तरी शासकीय जागेत दुप्पट झाडे लावुन घेण्याची उचित कार्यवाही करावी.
3. यु. जे. चामरगोरे, जी. एम. टीईसिएच & प्रोजेक्ट डायरेक्टर पीयुआय भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण कामगार चौक एन-4 औरंगाबाद यांना प्रत देवुन कळविण्यात येते की, सदर तोडलेल्या झाडाचा हर्रासी करण्यात येवुन त्यातुन येणारी रक्कम 0029 महसुल शिर्षकाखाली जमा करावी. व तसेच सदर परवानगी ही दुप्पट फळदार झाडे लावण्याचे अटी वर देण्यात आलेली आहे. सदर झाडे व काटेरी छोटी मोठी झाडे तोडण्यांत येवुन दुप्पट झाडे लावण्यात यावी असे शासनाचे वतीने आवाहन करण्यात येत आहे. तसेच उपरोक्त अटीचे पालन होईल याकडे लक्ष देण्यात यावे.

उप विभागीय अधिकारी (महसुल)
पैठण - फुलंब्री,
मुख्यालय - औरंगाबाद.

NHAI PIU AURANGABAD
Inward No 1918
Date 12/8/15
Filed in
Sign

M(R)G

punarv-2015

वाचा: (१) महाराष्ट्र झाडे तोडण्याबाबत (नियम) अधिनियम १९६४ चे कलम ३ (१-ब)

(२) उपवनसंरक्षक, औरंगाबाद वन विभाग औरंगाबाद यांचे पत्र दिनांक :- १२/१२/२०१४

(३) यु. जे. चामरगोरे, जी.एम. & प्रोजेक्ट डायरेक्टर पीयुआय औरंगाबाद यांचा अर्ज दिनांक ०७/०५/२०१५

(४) तहसिलदार पैठण यांचा प्रस्ताव जा.क्र.२०१५/जमा-२/कावी दिनांक १५/०७/२०१५

जा.क्र.२०१५/जमाबंदी/झाडतोडी/कावी-५४५

उप विभागीय अधिकारी, पैठण-फुलंब्री,

मुख्यालय- औरंगाबाद

दिनांक :- २४ /०७ / २०१५

नमुना-२

महाराष्ट्र झाडे तोडण्या बाबत (नियम)अधिनियम १९६४ यांच्या (कलम) ३(ब) अन्वये भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, कामगार चौक एन-४ औरंगाबाद कार्यालय यांनी राष्ट्रीय महामार्ग एन. एच. २११ चे चौपदरीकरणांतर्गत येडशी - औरंगाबाद की.मी. १००/००० ते २९०/२०० दरम्यानचा रस्ता रुंदीकरण व्यवस्थेमध्ये अडचन निर्माण करीत असल्यामुळे सदर झाडे व काटेरी झुडपे काढण्यास परवानगी देण्यात यावी असे संदर्भिय पत्र क्र.२ नुसार प्रस्तावित केलेले आहे.

आणि ज्याअर्थी, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण कामगार चौक एन-४ औरंगाबाद यांनी राष्ट्रीय महामार्ग एन.एच. २११ चे चौपदरीकरणाअंतर्गत येडशी -औरंगाबाद कि.मी. १००/००० ते २९०/२०० दरम्यानचा रस्ता रुंदीकरण व्यवस्थेमध्ये अडचण निर्माण करीत असल्यामुळे सदर झाडे व काटेरी झुडपे काढण्यास परवानगी देण्यात यावी अशी विनंती केलेली आहे.

म्हणुन त्याअर्थी, महाराष्ट्र झाडे तोडण्या बाबत (नियमन)अधिनियम १९६४ यांच्या १ (कलम)ब अन्वये ,कोलीबोडखा,ते थापडीतांडा या दरम्यान असलेली पैठण तालुक्यातील आर. एच. एस २११ झाडे एल.एच. एस १८६ असे एकुण ३९७ झाडे तोडण्या बाबत अडचण निर्माण करीत असल्याचे अहवालात नमुद केलेले आहे. म्हणुन त्याअर्थी सदर ३९७ झाडे तोडण्यास खालील अटी व शर्तीस अधिन राहुन राष्ट्रीय महामार्ग एन.एच. २११ चे चौपदरीकरणांतर्गत येडशी - औरंगाबाद कि.मी. १००/००० ते २९०/२०० यया दरम्यानचा रस्ता रुंदीकरणा अंतर्गत पैठण तालुक्यातील गांवाच्या हद्दीतील झाडे तोडण्यास परवानगी देण्यात येत आहे. सदर कोणत्याही व्यक्तीच्या मालमत्तेच्या हानी होणार नाही या दृष्टीने नुकसान भरपाई भरण्यास प्रतिगृहीता पात्र असेल.

1728

28/7/2015

१. सदर परवानगी ज्या तारखेस ती देण्यात आली त्या तारखेपासुन सहा महिने कालावधीसाठी वैद्य असेल.

२. महामार्गाचे प्रत्यक्ष काम सुरु करण्याचे पंधरा दिवस आधी सदर झाडे तोडण्याचे काम सुरु करावे. त्या अगोदर झाडे तोडु नयेत. व या बाबत यु. जे चामरगोरे. जी.एम. टीइसिएच & प्रांजेक्ट डायरेक्टर पिआययु राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, कामगार चौक, एन-४ औरंगाबाद यांनी खात्री करावी.

३.तसेच सदर परवानगी ही दुप्पट शासकीय जागेत झाडे लावण्याचे अटीवर देण्यात येते.

४. सदर झाडे व इतर छोटी मोठी काटेरी झुडुपांची हर्रास करण्यात येवुन त्यातुन येणारी रक्कम ००२९ या महसुल शिर्षखाली जमा करुन अनुपालन अहवाल सादर करावा.

५. सदर नमुद करण्यात आलेल्या अटीचे पालन न केल्यास सदर परवानगी ही रद्द समजण्यात येईल.

सोबत: विवरणपत्र

उप विभागीय अधिकारी (महसुल)
पैठण - फुलंब्री,
मुख्यालय - औरंगाबाद.

प्रतिलिपी:

1. मा. जिल्हाधिकारी औरंगाबाद , यांना माहितीस्तव सविनय सादर

2. तहसिलदार पैठण यांना देवुन कळविण्यात येते की, संबंधीत तलाठी/मंडळ अधिकारी यांना झाडे व काटेरी छोटी मोठी झुडपे तोडण्यात येवुन त्याऐवजी फळदार झाडे लावण्याच्या अटीवर परवानगी देण्यात आलेली आहे. तरी शासकीय जागेत दुप्पट झाडे लावुन घेण्याची उचित कार्यवाही करावी.

3. यु. जे. चामरगोरे, जी. एम. टीईसिएच & प्रोजेक्ट डायरेक्टर पीयुआय भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण कामगार चौक एन-4 औरंगाबाद यांना प्रत देवुन कळविण्यात येते की, सदर तोडलेल्या झाडाचा हर्रासी करण्यात येवुन त्यातुन येणारी रक्कम 0029 महसुल शिर्षकाखाली जमा करावी. व तसेच सदर परवानगी ही दुप्पट फळदार झाडे लावण्याचे अटी वर देण्यात आलेली आहे. सदर झाडे व काटेरी छोटी मोठी झाडे तोडण्यांत येवुन दुप्पट झाडे लावण्यात यावी असे शासनाचे वतीने आवाहन करण्यात येत आहे. तसेच उपरोक्त अटीचे पालन होईल याकडे लक्ष देण्यात यावे.

**उप विभागीय अधिकारी (महसुल)**
**पैठण - फुलंब्री,**
**मुख्यालय - औरंगाबाद.**

जा.क्रं.:-कक्ष-५/जमीन/प्रक्र.१०० (१४-१५)/386 /१६-१७
औरंगाबाद - ४३१ ००५ दिनांक:26/08/२०१६

प्रति,
प्रकल्प संचालक,
भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण,
परियोजना कार्यान्वयन, इकाई,
औरंगाबाद (महाराष्ट्र)

विषय:- Rehabilitation and Upgradation from existing २ lane to ४ lane of Yedshi to Aurangabad section of NH-२११ from km १००/००० to km २९०/२०० under NHDP Phase IV A&B in the State of Maharashtra-for diversion of Forest land १.०४१ ha.

संदर्भ: - १. केंद्र शासनाकडील पत्र क्रं.एफसी-I/एमएच-०४/२०१५/NGP/२९२ दिनांक ११.०९.२०१५
२. अपर प्रधान मुख्य वन संरक्षक व केंद्रस्थ अधिकारी नागपूर यांचेकडील पत्र कक्ष १७/नोडेल१/आयडी १२३८६/१२२०/१५-१६ दिनांक ०५.१०.२०१५.
३. विभागीय वन अधिकारी, उस्मानाबाद यांचे पत्र क्रं. अ/जमीन/वसंअ/१३४३/२०१५.१६ दि.३०.०३.२०१६
४. आपलेकडील पत्र क्रं. NH-२११ (A-Y)/camp दि.२६.०४.२०१६

उपरोक्त विषयांकित प्रकरणी केंद्र शासनाने दिनांक ११.०९.२०१५ च्या पत्रान्वये विषयांकित प्रस्तावास वन (संवर्धन) अधिनियम १९८० कलम २ अंतर्गत तत्वत: मान्यता प्रदान केलेली आहे. मान्यता प्रदान करते वेळी केंद्र शासनाने घातलेल्या शर्ती व अटीची पुर्तता प्रकल्प यंत्रणेने केलेली आहे. प्रकल्प यंत्रणेने पुर्तता केल्याचा अहवाल विभागीय वन अधिकारी उस्मानाबाद यांनी संदर्भ क्रं.३ अन्वये सादर केलेला आहे. अटी पुर्ततेचा अहवाल अपर प्रधान मुख्य वन संरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांना या कार्यालयाचे पत्र क्रं. Desk-५/Land/FCA/CR१००/४१ दि.१३.०४.२०१५ अन्वये सादर करण्यात आलेला आहे. एकरेषीय (Linear) प्रकल्पांना तत्वत: मान्यता दिल्यानंतर प्रकल्पाचे काम जलद गतीने सुरू करून सुविधा उपलब्ध होण्याच्या दृष्टीने सदर तत्वत: मान्यता दिलेल्या पत्रातील आवश्यक अटीची पुर्तता प्रकल्प यंत्रणेने केल्यानंतर प्रकल्पांतर्गत वन जमिनीवरील झाडे तोडण्यास तसेच कामे सुरू करण्यास परवानगी देण्याबाबत केंद्र शासनाचे दिनांक ०७.०५.२०१५ व महाराष्ट्र शासनाचे दिनांक ०१.०७.२०१५ च्या परिपत्रक मधील तरतूदी नुसार खालील शर्ती व अटीच्या अधीन राहून राष्ट्रीय महामार्ग क्रं. २११ येडशी ते औरंगाबाद या रस्त्याच्या कामात येणारे वन जमीन मध्ये वृक्ष तोड करणे व वनक्षेत्रात काम करण्यास परवानगी देण्यात येत आहे.

(१) केंद्र शासनाने त्यांच्या कडील दिनांक १९.११.२०१५ च्या पत्रान्वये राष्ट्रीय महामार्ग क्रं. २११ येडशी ते औरंगाबाद चार पदरी करणाचे १.०४१ हेक्टर क्षेत्रास तत्वत: मंजूरी दिलेली आहे. सदर मंजुर केलेल्या क्षेत्रातच प्रकल्प यंत्रणा म्हणून आपणास वृक्ष तोड व वनक्षेत्रात काम करण्यास या पत्राद्वारे परवानगी देण्यात येत आहे. त्या व्यतिरिक्त इतर वनक्षेत्रात कोणत्याही प्रकारचे कामे करू नये.

(२) राष्ट्रीय महामार्ग क्रं. २११ येडशी ते औरंगाबाद चार पदरी करणाच्या कामात येणा-या ११३ झाडांची तोड वनक्षेत्रपाल प्रादेशिक भूम यांच्या मार्फत करून घ्यावी. त्यापेक्षा जास्तीची वृक्षतोड कोणत्याही परिस्थितीत करू नये.

(३) आपणाकडुन प्रकल्प यंत्रणा म्हणून केंद्र शासनाच्या अटीतील पुर्ततेचा आणि महाराष्ट्र शासनाच्या अटीच्या पैकी कोणताही अटीचा भंग करण्यात येऊ नये. तसे केल्यास आपले काम थांबविण्यात येईल.

(४) आपण प्रकल्प यंत्रणा म्हणून वन (संवर्धन) अधिनियम १९८० अंतर्गत केंद्र शासनाने दिलेल्या सर्व अटीचे व नियमांचे पालन करणे आपणावर बंधनकारक आहे. तसेच यापुढे केंद्र शासनाकडून प्रकल्पा संदर्भात कोणत्याही जास्तीच्या अटी प्राप्त झाल्यास त्या आपणास कळविण्यात येतील. त्यांचे ही पालन करणे आपणावर बंधनकारक राहील.

(५) प्रकल्प यंत्रणा म्हणून आपण वरील १ ते ५ अटींचे पालन करीत असल्याबाबतचे हमीपत्र विभागीय वन अधिकारी, उस्मानाबाद वनविभाग यांचेकडे सादर करणे आवश्यक राहील.

मुख्य वन सरंक्षक (प्रादेशिक)
औरंगाबाद

प्रतिलिपी:-अपर प्रधान मुख्य वनसरंक्षक व केंद्रस्थ अधिकारी महाराष्ट्र राज्य, नागपूर यांना माहितीस्तव सविनय सादर.

प्रतिलिपी:- सचिव (वने), महसूल व वनविभाग मंत्रालय, मुंबई यांच्या कडील दिनांक ०१.०७.२०१५ च्या परिपत्रकाच्या अनुषंगाने माहितीस्तव सस्नेह अग्रेषित.

प्रतिलिपी:-विभागीय वन अधिकारी, उस्मानाबाद वनविभाग यांना माहितीस्तव व पुढील आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना.

२/- केंद्र शासनाने तत्वत: मंजूरी दिलेल्या वनक्षेत्राव्यतिरिक्त इतर कोणत्याही वनक्षेत्रात प्रकल्प यंत्रणा काम करणार नाही, याबाबत क्षेत्रील कर्मचारी यांना नियमित देखभाल करण्याबाबत सूचना द्याव्यांत. वृक्षतोडी बाबत वनक्षेत्रपाल प्रादेशिक भूम यांना योग्य ते निर्देश द्यावेत. जर प्रकल्प यंत्रणेने वन भंग केल्यास तात्काळ काम थांबविण्यात येऊन आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी व त्याचा सविस्तर अहवाल या कार्यालयास सादर करावा.

-Sd-
मुख्य वन सरंक्षक (प्रादेशिक)
औरंगाबाद

Divisional Forest Officer, Beed
Inword No.................
Date ........................
Section ....................

# मुख्य वन संरक्षक (प्रादेशिक), औरंगाबाद यांचे कार्यालय.

वनभवन, उस्मानपूरा, स्टेशन रोड, औरंगाबाद

जा.क्र.:-कक्ष-५/जमीन/प्रक्र.५५ (१४-१५)/३१६ /१६-१७
औरंगाबाद - ४३१ ००५ दिनांक: २६/०४/२०१६

प्रति,
प्रकल्प संचालक,
भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण,
परियोजना कार्यान्वयन, इकाई,
औरंगाबाद (महाराष्ट्र)

विषय:- Rehabilitation and Upgradation from existing २ lane to ४ lane of Yedshi to Aurangabad section of NH-२११ from km १००/००० to km २९०/२०० under NHDP Phase IV A&B in the State of Maharashtra-for diversion of Forest land ०.५८ ha.

संदर्भ: - १. केंद्र शासनाकडील पत्र क्रं.६-एमएचबी-८४/२०१४ बीएचओ/४८१ दिनांक १९.११.२०१५
२. अपर प्रधान मुख्य वन संरक्षक व केंद्रस्थ अधिकारी नागपूर यांचेकडील पत्र कक्ष १७/नोडेल१/आयडी १२३६७/१६७५/१५-१६ दिनांक १०.१२.२०१५.
३. विभागीय वन अधिकारी, बीड यांचे पत्र क्रं. आ/जमीन/वसंअ/३४/२०१५.१६ दि.०५.०४.२०१६
४. आपलेकडील पत्र क्रं. NH-२११ (A-Y)/camp दि.२६.०४.२०१६

उपरोक्त विषयांकित प्रकरणी केंद्र शासनाने दिनांक १९.११.२०१५ च्या पत्रान्वये विषयांकित प्रस्तावास वन (संवर्धन) अधिनियम १९८० कलम २ अंतर्गत तत्वत: मान्यता प्रदान केलेली आहे. मान्यता प्रदान करते वेळी केंद्र शासनाने घातलेल्या शर्ती व अटीची पुर्तता प्रकल्प यंत्रणेने केलेली आहे. प्रकल्प यंत्रणेने पुर्तता केल्याचा अहवाल विभागीय वन अधिकारी बीड यांनी संदर्भ क्रं.३ अन्वये सादर केलेला आहे. अटी पुर्ततेचा अहवाल अपर प्रधान मुख्य वन संरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांना या कार्यालयाचे पत्र क्रं. Desk-५/Land/FCA/CR५५/४२ दि.१३.०४.२०१५ अन्वये सादर करण्यात आलेला आहे. एकरेषीय (Linear) प्रकल्पांना तत्वत: मान्यता दिल्यानंतर प्रकल्पाचे काम जलद गतीने सुरू करून सुविधा उपलब्ध होण्याच्या दृष्टीने सदर तत्वत: मान्यता दिलेल्या पत्रातील आवश्यक अटीची पुर्तता प्रकल्प यंत्रणेने केल्यानंतर प्रकल्पांतर्गत वन जमिनीवरील झाडे तोडण्यास तसेच कामे सुरू करण्यास परवानगी देण्याबाबत केंद्र शासनाचे दिनांक ०७.०५.२०१५ व महाराष्ट्र शासनाचे दिनांक ०१.०७.२०१५ च्या परिपत्रक मधील तरतूदी नुसार खालील शर्ती व अटीच्या अधीन राहून राष्ट्रीय महामार्ग क्रं. २११ येडशी ते औरंगाबाद या रस्त्याच्या कामात येणारे वन जमीन मध्ये वृक्ष तोड करणे व वनक्षेत्रात काम करण्यास परवानगी देण्यात येत आहे.

(१) केंद्र शासनाने त्यांच्या कडील दिनांक १९.११.२०१५ च्या पत्रान्वये राष्ट्रीय महामार्ग क्रं. २११ येडशी ते औरंगाबाद चार पदरी करणाचे ०.५८ हेक्टर क्षेत्रास तत्वत: मंजूरी दिलेली आहे.सदर मंजुर केलेल्या क्षेत्रातच प्रकल्प यंत्रणा म्हणून आपणास वृक्ष तोड व वनक्षेत्रात काम करण्यास या पत्राद्वारे परवानगी देण्यात येत आहे. त्या व्यतिरिक्त इतर वनक्षेत्रात कोणत्याही प्रकारचे कामे करू नये.

(२) राष्ट्रीय महामार्ग क्रं. २११ येडशी ते औरंगाबाद चार पदरी करणाच्या कामात येणा-या २०१ झाडांची तोड वनक्षेत्रपाल प्रादेशिक बीड यांच्या मार्फत करून घ्यावी. त्यापेक्षा जास्तीची वृक्षतोड कोणत्याही परिस्थितीत करू नये.

(३) आपणाकडुन प्रकल्प यंत्रणा म्हणून केंद्र शासनाच्या अटीतील पुर्ततेचा आणि महाराष्ट्र शासनाच्या अटीच्या पैकी कोणताही अटीचा भंग करण्यात येऊ नये. तसे केल्यास आपले काम थांबविण्यात येईल.

(४) आपण प्रकल्प यंत्रणा म्हणून वन (संवर्धन) अधिनियम १९८० अंतर्गत केंद्र शासनाने दिलेल्या सर्व अटीचे व नियमांचे पालन करणे आपणावर बंधनकारक आहे. तसेच यापुढे केंद्र शासनाकडून प्रकल्पा संदर्भात कोणत्याही जास्तीच्या अटी प्राप्त झाल्यास त्या आपणास कळविण्यात येतील. त्यांचे ही पालन करणे आपणावर बंधनकारक राहील.

(५) प्रकल्प यंत्रणा म्हणून आपण वरील १ ते ५ अटींचे पालन करीत असल्याबाबतचे हमीपत्र विभागीय वन अधिकारी, बीड वनविभाग यांचेकडे सादर करणे आवश्यक राहील.

मुख्य वन संरक्षक (प्रादेशिक)
औरंगाबाद

प्रतिलिपी:-अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी महाराष्ट्र राज्य, नागपूर यांना माहितीस्तव सविनय सादर.

प्रतिलिपी:- सचिव (वने), महसूल व वनविभाग मंत्रालय, मुंबई यांच्या कडील दिनांक ०१.०७.२०१५ च्या परिपत्रकाच्या अनुषंगाने माहितीस्तव सस्नेह अग्रेषित.

प्रतिलिपी:-विभागीय वन अधिकारी, बीड वनविभाग यांना माहितीस्तव व पुढील आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना.

२/- केंद्र शासनाने तत्वत: मंजूरी दिलेल्या वनक्षेत्राव्यतिरिक्त इतर कोणत्याही वनक्षेत्रात प्रकल्प यंत्रणा काम करणार नाही, याबाबत क्षेत्रील कर्मचारी यांना नियमित देखभाल करण्याबाबत सूचना द्याव्यात. वृक्षतोडी बाबत वनक्षेत्रपाल प्रादेशिक बीड यांना योग्य ते निर्देश द्यावेत. जर प्रकल्प यंत्रणेने वन भंग केल्यास तात्काळ काम थांबविण्यात येऊन आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी व त्याचा सविस्तर अहवाल या कार्यालयास सादर करावा.

मुख्य वन संरक्षक (प्रादेशिक)
औरंगाबाद

जा.क्र. ब/ जमीन / 146 / २०१५-१६
बीड : ४३११ /२ दिनांक : 28 / 4/२०१६

प्रतिलिपी :- वन परिक्षेत्र अधिकारी, बीड यांना माहितीस्तव व आवश्यक त्या कार्यवाहीस्तव देण्यात येते.

२/. प्रस्तुत प्रकरणी अट क्र. 2 चे संदर्भात आवश्यक ती कार्यवाही योजावी व केलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल या कार्यालयास सादर करावा.

विभागीय वन अधिकारी
बीड